24 SEP 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक प्रश्नांच्या मांडणीत सखोलपणा हवा

## संजयकाका पाटील; शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संसदेमध्ये सामाजिक प्रश्न उपस्थित करताना प्रथम त्या विषयाची सखोल माहिती अभ्यासणे आवश्यक असते. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर विधायक चर्चा होऊन विकासाचे नवे मार्ग खुले होतात, असे प्रतिपादन खासदार संजयकाका पाटील यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील निलांबरी सभागृहामध्ये चौदावी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. विद्यापीठ आणि संसदीय कामकाज मंत्रालयातर्फे आयोजित करण्यात आली होती.



कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील चौदाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी खासदार संजयकाका पाटील यांनी मार्गदर्शन केले.

### सहाजणांना विशेष संसद पुरस्कार

या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांतील ५५ युवा संसद सदस्य सहभागी झाले होते. परदेशी पाहुणे म्हणून केनियाचे ब्रॅन रॉय, हेसला लुईस हे उपस्थित होते. यशवंत पुकळे, निखिता पिसे, नवीन राऊत, राजश्री गोसावी, हेरंब सावंत, रोहिणी अवताडे यांना विशेष संसद पुरस्कार मिळाला. भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.

खासदार संजयकाका पाटील म्हणाले, खऱ्या अर्थाने सर्वसामान्य मुलांपर्यंत निःस्पृहपणे शिक्षण पोहोचविण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. सध्या सुरु असलेले शिक्षणामधील व्यापारीकरण थांबविणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले पाहिजेत. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी प्रथमतः इतरांचे ऐकण्याची कला अवगत करावी; त्यामुळे हाती घेतलेले विधायक कार्य पूर्ण करण्यास गती मिळते. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, समन्वयक प्रा. पवन शर्मा, संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही. ए. रायकर, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, डॉ. मनोहर वासवानी, आर. एस. पाटील, हर्षद ठाकूर, संतोष सुतार उपस्थित होते. कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले. दरम्यान, या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी संसदीय कामकाजाचा अनुभव घेत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवरील समस्या मांडण्याचा प्रयत्न केला. यामध्ये तोंडी तलाकबंदी, सर्जिकल स्ट्राईक, आतंकवाद, गोवंश हत्याबंदी, शेतकरी आत्महत्या, नोटाबंदी, जीएसटी, सैनिकांच्या मृत्यूचे प्रमाण यावर अभ्यासात्मक चर्चा केली.